***सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. २ यांचा पुरावा***

मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की —

**माझे नांव** : संदिप पंढरीनाथ गव्हाणे,
**वय** : ४० वर्षे, **धंदा :** रिक्षा चालक
**राहणार** : डिंग्रजवाडी, ता.शिरूर, जि.पुणे.

**सरतपासणी: सरकार तर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस.एम. आरळे:**

**१.** दिनांक १६/०५/२०२० रोजी मला पोलिसांनी बोलावले नव्हते व माझ्या समक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा केलेला नव्हता. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहिती नाही. घटनास्थळ पंचनामा अगोदरच निशाणी ३९ वर आहे. पोलिसांनी माझ्या समक्ष काही जप्त केले नव्हते. आता मला जप्ती पंचनामा दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुराबाबत मला काहीही माहिती नाही. जप्ती पंचनामा अगोदरच निशाणी ४० वर आहे.

***(सदर साक्षीदार हे अभियोग पक्षास सहाय्य करित नसल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदारासस उलटतपासात विचारण्यात येणारी उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.)***

**उलटतपासणी: सरकार तर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस.एम. आरळे :**

**२.** दिनांक १५/०५/२०२० व दिनांक १६/०५/२०२० रोजी मी माझी रिक्षा घेवुन वाघोली, कोरेगाव या ठिकाणी गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष घटनास्थळ पंचनामा तयार करण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष दगड व काठी जप्त केली होती व तसा जप्ती पंचनामा तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, मला घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा वाचुन दाखविला होता व त्यावर मी सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला मदत करण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास</u>: <u>आरोपींतर्फे सन्माननीय विधीज्ञ श्री. जी. ई. दरेकर :</u>**

**३.** नाकारले.

**उलटतपास संपला. फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत.

SANJAY DIGAMBERRAO WANKHEDE
2025.10.03 17:05:44 +0530

ठिकाण : शिरूर.
दिनांक : ०३/१०/२०२५.

**(सं. दि. वानखेडे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
घोडनदी, ता.शिरूर, जि.पुणे.